हसत खेळत जेवणं उरकली. मनालीने फ्रीज उघडून सगळयांना मुख्वासाचे पान दिले. रोहित -- चला निघतो रे अनिकेत !

अनिकेत - अरे एवढया लौकर निघालास ?

रोहित -- हो बाबा ! विररारला जायचे आहे. पोहोचायला खूप वेळ लागेल. आणि त्यात हा पाऊस. आता ट्रेन्स वेळेवर असू देत मंजे मेलावले . चल. बाय-बाय

अनिकेत व मानली -- बाय !

रोहित गेल्यावर मनालीचे मागचे आवारे परायेन्तर अनिकेत थोडा वेळ T.V. लावून बातम्या ऐकत बसला. मनालीचे हात काम करत होते पण डोक्यातमात्र विचारांचा काहूर मजल होत. अतापार्यंतर उसन औसान आणून सगळयांशी नॉर्मल वागत होती पण आता काय ? अनिकेतला सामोरी कशी जाऊ ? त्याने झार नेहेमी प्रमाणे तिला मिठीत घेतला तर मात्र तिला नकायच रडू कोसळेल ह्याची भीती होती. उद्या रोहितला भेटून सगळया गोष्टींचा शहानिशा करून मगच काय ते ठरवू. पावसात भिजल्यामुळे डोके दुखत असल्याचा बहाणा करून मानली लाईट ऑफ करून डोळे मिटून पलंगावर पडली. अनिकेतही झ्होपून गेला.

मानलीला मात्र झराही झ्होप लागली नाही. एखादा चित्रपट पहातास्ल्यासारखे सगळया गोष्टी डोळयासमोरून सरकत होत्या. बाबांच्या नोकरी सतत होणार्या बदल्या मुळे ; मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून

आईला नेहेमीच बाबांपासून दूर राहावे लागले. पण जसे रोहित-राहुल थोडे मोठे होऊन त्यांना समाज आली, जबाबदारी कळू लागली तसे त्यांना त्यांच्या मामामामीकडे ठेऊन लहानग्या पाच वर्षांच्या मनालीला बरोबर घेऊन त्यांची आई असंला बाबांच्याकडे राहैलागेली. कारण त्यांचीही खूप आबाळ व्हीची. मामामामीही खूप प्रेमर आहेत. त्यांनीही हि जबाबदारी स्वखुशीने घेतली.

मानली आईबाबांच्या उबदार पंखांखाली आणि मायेच्या छायेत वाढत होती. गोरा-रंग, ते गोबरे गाल, आणि त्यावरील खळी, नाझुक्षी जीवनी आणि हसल्यावर दिसणारे ते पान्ध्रेशुब्रा दात, काळयाबोर कुरळया केसांच्या लढी, फारच मोहोग दिसैची. अभैसातही हुशार !

शाळेच्या मोठ्या सुत्यान मध्ये कधी मानली आईबाबांबरोबर मामामिकडे आपल्या भावंडाना भेटीला झीची तर कधी रोहित-राहुल ह्यांच्याकाध्ये जिचे. खूप मज-मस्ती करिअचे. दोन्ही भावंदना बहिणीचामात्र मोठा कौतुक होते. फारच आनंदात सुखात बालपण सरले. हळू हळू काळी मोठी हून उमलू लागली. जसजशी मानली मोठी होत गेली तसतशी ती अधिकच सुंदर जिसु लागली. अनेक मुलांच्या नजर तिचा मागोवा घेऊ लागल्या.

मानली बीकॉम च्या शेवटच्या वर्षात असताना ते जम्मू ला होते. तिच्याच कोलेज मधील म्ब-च्या शेवटच्या वर्षात शिकणाऱ्या सुनील गोरे नावाच्या मुलाने तिला मागणी घातली. हा मुलगा काश्मिरी ब्राह्मण होता. आई-वडील व एक बहिण एवढा सुटसुटीत कुटुंब होता. स्वतःचा घर, गाडी, वडिलांचा केशराचा बिसिनेस होता. नाही म्हणायला कुठेच जागा नव्हती. फायनल

परीक्षा आटपल्या-आटपल्या लग्नहि झले. अगदी खुशीत होती मनाली. लहानपणापासून काश्मीरला असलेला सुनिलाही लालसर गोरा, उंच, रुबाबदार, अगदी मनालीला साजेसाच होता. दोन्ही कुटुंब आनंदात होती. मनालीला तर अगदी आकाश ठेंगणे झाल्या सारखे वाटत होते.

घरातील पूजा आटपली आणि हे जोडपे पेहेलगामला हनिमूनसाठी गेले. दोघांची एकत्र येण्याची वेळ जशी जवळ आली तशी मनालीच्या अंगावर लाजेने रोमांच उभे राहिले, छातीचे ठोके वाढले. माहित नाही काय झले ते पण सुनील तिला चिमटे काढू लागला, डोक्यात गालावर, हातापायावर चापट्या मारु लागाला. तिला काय झले ते कळलेच नाही. प्रथम तिने विचार केला तो लाडाने तिच्या अंगाशी चाळे करत असेल, आणि त्याचा हात तिलाच जास्त जोरात लागल्या सारखे तिला वाटत असेल. पण मग थोड्या वेळाने सुनीलने व्यवस्तीत नवऱ्याचा हक्क बजावला. हे असेच रोज व्हायचे. दिवस अगदी हसत-खेळत, मस्ती-मजा करत निघून जजायचा. रात्री मात्र वेगळाच सुनील असायचा.

सुरुवातीला लाजेमुळे मनाली बुजली होती. पण जेव्हा हातामध्ये पट्टी आली आणि पट्टीच्याठिकाणी काठी आली तेव्हा मात्र तिने हि गोष्ट आईच्या व सासूच्या काना वर घातली. झाले. लगेच एक नाही दोन दोन डॉक्टर झाले. डॉक्टरांनी सुनील मध्ये हि वाईट विकृती असल्याचे सांगितले. हा एक प्रकारचा आजार असतो. सुनीलची औषधे सुरु झली. एरवी एवढा चांगला असणारा, चांगला वागणारा सुनील आणि हा कुठला आजार ?

मनालीचे आई-वडील तिला तिथे राहून द्यायला तयार नव्हते. पण मनालीलाच त्याच्या बद्दल  कणव वाटत होती. डॉक्टरांच्या उपचारांनी परत चांगला होईल असे वाटत होते. मनालीने थोडे धीराने घायचे ठरवले.

काळया कुट्ट अंधाराच्या पोटीच प्रकाशाचा जन्म असतो. सुख आणि दु:ख ह्या दोन धाग्यानीच आयुष्य विणलेले असते. तुम्हाला त्यातला एक धागाच नकोसा वाटत असेल तर कस चालेल ? मनालीने खूप सोसले. कधीतरी एखादी गोष्टी अचानक उभी राहते आणि त्यामागे नक्कीच काहीतरी कारण असते. अचानक काश्मीरमधील एका चकमकीत मोठा गोळीबार झला. त्याच वेळी सुनीलही गायब झाला. त्याला काय झले, तो कुठे गेला, कळलेच नाही. पोलिस तपास झला, हॉस्पिटले शोधली, पण त्याचा पत्ताच लागला नाही.

नंतर मात्र वाट पाहून दोन वर्षांनी मनाली, आई-बाबांच्या बरोबर मुंबईला आपल्या भावा कडे रोहित कडे आली. आता रोहित विरारला स्वतःच्या फ्ल्याट मध्ये राहत होता. त्याच्याकडे, त्याचा लहानपणापासूनच असलेला जिवलग मित्र, अनिकेत, वरचेवर येत असे. फारच हरहुन्नरी व सालस मुलगा ! रोहितचा अनिकेत हा खास मित्र असल्यामुळे त्याला मनालीची इथ्थांभूत माहिती होती. खरेतर मनाली सुट्टी मध्ये मुंबईला आल्यावर अनिकेत व मनालीची नेहेमीच भेट वव्हायची.

दोघंही एकत्र डबा ऐसपैस, लगोरी, पत्ते, वगैरे खेळ खेळायचे. जसे मोठे होत गेले तसे अनिकेतच्या मनात तिने घर केले होते. ती त्याला आवडू लागली होती. पण योग्य वेळी हे मित्राच्या कानावर घालण्याआधीच मनालीचे लग्न ठरले होते.

ह्या वेळी मात्र अनिकेतनि ठाम निश्चय करून वेळ न घालवता सरळ रोहितला मनाली आपल्याला लहानपणापासूनच आवडत असल्याचे सांगून तिच्याशी लग्न करण्याची इच्छा प्रगट केली. मोठ्यांच्या आशीर्वादाने मनाली व अनिकेतचा विवाह झला. मनाली संसारात चांगली रमली. दोघानाही खऱ्या सुखाचा उपभोग घेता आला. प्रेमाने संसार चालू होता. अनिकेत, मनालीची प्रथम पासूनच खूप काळजी घ्यायचा ; तिच्या मनाला फुलासारखे जपायचा. त्यांना एक गोंडस मुलगीही झाली. ' ओवी ' ततीच नाव ! मस्त छान हसत-खेळत सगळ चालू होत. आता लग्न होऊन सहा-सात वर्ष झली होती. अचानक मनालीला ऑफिस मध्ये एक फोन आला. फोनवरील पलीकडच्या व्यक्तीचे भाषण ऐकून तिचे पाय लटपट कपू लागले, घश्याला कोरड पडली, व अंगाला घाम फुटला. पलीकडील व्यक्तीने तिला एक फोन नंबर द्येउन त्या नंबर वर मनालीला फोन करायला सांगितला. व चारचदिवसांनी त्याला हॉस्पिटलमधून डिस्चार्ज ळिणार असे सांगितले. वेळ फारच कमी होता. काय करावे ते तिला काळे ना. म्हणूनच आज अनिकेतला उशीर होणार आहे म्हटल्यावर तिनी रोहित ला घरी बोलावून घेतले होते. रोहितशी तिला सर्व बोलायचे होते पण आत्तातरी मानली रोहितला फक्त एका पेपरवर लिहिलेला तो फोन नम्बरच देऊ शकली होती.